09-02-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 02/08/2025 11:25 PM Page 1



# कात्यायनी बाणेश्वर विद्यालयात ‘बाजार दिन’ उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड



काणकोण : बाजार दिनाचे फीत कापून उद्‍घाटन करताना दर्शन नाईक गावकर. बाजूला पदाधिकारी.

**काणकोण, दि.८ :** श्री कात्यायनी बाणेश्वर विद्यालयाचा वार्षिक ‘बाजार दिन’ शाळेच्या प्रांगणात व्यवस्थापन, शिक्षक, पालक – शिक्षक संघ आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी, शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दर्शन नाईक गावकर प्रमुख पाहुणे होते. इन्स्टिट्यूटो डी एज्युकेशन प्रोग्रेसिव्हाचे अध्यक्ष अनिल के. नाईक देसाई हे सन्माननीय पाहुणे होते.

व्यासपीठावर व्यवस्थापकीय समितीचे सचिव राजेश देसाई, व्यवस्थापक दामोदर देसाई,

महाबळेश्वर देसाई, आनंदू कोमरपंत, श्रीमती तेजश्री देसाई, पी.टी.ए. अध्यक्ष प्राथमिक विभाग

श्रीमती स्नेहल देसाई, पी.टी.ए. अध्यक्ष माध्यमिक विभाग श्रीमती सोबिता बोर्जेस आणि मुख्याध्यापक बेनी फर्नांडिस उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक आणि घरगुती मिठाई, खाद्यपदार्थ, हस्तकला, भाज्या, चित्रे आणि पुस्तके विकणारे स्टॉल लावले होते. या कार्यक्रमाला २०० हून अधिक पालक तसेच परिसरातील रहिवासी आणि इतर पाहुण्यांनी हजेरी लावली.

तत्पूर्वी, प्रमुख पाहुणे दर्शन नाईक गावकर यांच्या हस्ते पारंपरिक दीपप्रज्वलन करून आणि रिबन कापून कार्यक्रमाचे उद्‍घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणाले की, बाजार दिन आयोजित केल्याने विक्री, व्यवस्थापन आणि संवाद कौशल्ये विकसित होण्यास मदत होते. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील लपलेल्या प्रतिभेला वाव मिळतो.

सर्व शाळांनी बाजार दिन आयोजित करावेत असे त्यांनी सांगितले. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्रमुख पाहुण्यांनी पी.टी.ए.ला आर्थिक मदतही केली. सन्माननीय पाहुणे अनिल के. नाईक देसाई आणि व्यवस्थापन समितीचे सचिव राजेश देसाई यांनीही भाषण केले.

याप्रसंगी मुख्य पाहुण्यांच्या हस्ते नवीन शाळेच्या इमारतीच्या बांधकामासाठी आर्थिक मदतीचे आवाहन करणारे एक माहितीपत्रकही प्रकाशित करण्यात आले.

पालक आणि पाहुण्यांसाठी संगीत खुर्ची, बास्केट पास करणे, फुगा फोडणे यासारखे खेळ आयोजित करण्यात आले. विजेत्या देवयानी पागी, डॉ. स्नेहल देसाई, नीतू महाले, आस्मा मुल्ला, दर्शना नाईक गावकर आणि करुणा कोमरपंत होत्या. विजेत्यांना पी.टी.ए. कडून बक्षिसे देण्यात आली. सुरुवातीला, पी.टी.ए. अध्यक्षा श्रीमती सोबिता बोर्जेस यांनी स्वागत भाषण केले. पी.टी.ए.च्या कोषाध्यक्षा श्रीमती वैशाली मुडकुडकर यांनी आभार मानले. शिक्षक गौरिश वेर्णेकर, प्रसन्ना पागी आणि श्रीमती श्रद्धा शेटकर यांनी आभार मानले.

# आंबिये महाविद्यालयात आग नियंत्रण व्यवस्थापनावर कार्यशाळा

**अधिकारी नामदेव परवार : डॉ.वीरेंद्र आमोणकर यांचा पुढाकार**

■ टीम दैनिक हेराल्ड



विर्नोडा : आगीवर नियंत्रण मिळविणाऱ्या उपकरणांची माहिती देताना मुख्य अधिकारी नामदेव परवार. सोबत प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर, डॉ.वीरेंद्र आमोणकर व विद्यार्थी.

**पेडणे, दि. ८ :** संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, विर्नोडा येथे उत्खनन कवायती आणि आग नियंत्रण व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. या कार्यशाळेत अग्निशामक दलातील ज्येष्ठ अधिकारी नामदेव परवार यांनी मार्गदर्शन केले. तर ही कार्यशाळा पदव्युत्तर वाणिज्य विभागाचे मुख्य समन्वयक डॉ. वीरेंद्र आमोणकर यांनी या कार्यशाळेचे आयोजन केलेले होते. प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यशाळेचा हेतू विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी व प्राध्यापक यांना आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण कसे मिळवावे आणि ऐनवेळी त्याचे व्यवस्थापन कसे करावे या संदर्भात माहिती देऊन त्यांना शिक्षित करणे हा होता. आभार डॉ. वीरेंद्र आमोणकर यांनी मानले.

### कार्यशाळेतील ठळक बाबी

कार्यशाळेच्या सुरुवातीला अग्निशामक दलातील ज्येष्ठ अधिकारी नामदेव परवार यांनी सादरीकरणाच्याद्वारे विद्यार्थ्यांना आगीवर नियंत्रण कसे मिळवावे, सुरक्षेची काळजी घेत परिसर कसा मोकळा करावा, अग्निशामक उपकरणे कोणती वापरावीत, त्यांचा वापर कसा करावा याची इत्थंभूत माहिती दिली. या कार्यशाळेत प्रात्यक्षिकावर भर देताना प्रत्यक्ष आगीवर नियंत्रण कसे आणावे, याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि शिक्षक मिळून १३७ जण सहभागी झालेले होते.

> **शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांकडे सर्वांगीण ज्ञान असलेच पाहिजे. परंतु जीवन जगताना त्याला व्यावहारिक ज्ञानही मिळाले पाहिजे. या उद्देशाने आग नियंत्रण व्यवस्थापनावर ही कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती.**
>
> –डॉ.वीरेंद्र आमोणकर,
> **मुख्य समन्वयक, पदव्युत्तर वाणिज्य विभाग शासकीय महाविद्यालय विर्नोडा.**



केपे : राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्‍घाटन समारंभात एम.के.जनार्थनम्, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयदीप भट्टाचार्य, डॉ. आर. जी.कुलकर्णी व इतर मान्यवर.

# पशुपालनातून शेतकऱ्याला स्थिर उत्पन्नाची प्राप्ती

■ टीम दैनिक हेराल्ड

**प्रो.डॉ. एम.के.जनार्थनम् : पशुसंवर्धन आणि शाश्वत विकास विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात**

**पर्वरी, दि. ८ :** भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याने शेतकऱ्याला बहुतांशवेळा त्याचा फटका बसतो. अशा काळात शेतक्याला स्थिर उत्पन्न आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याचे काम पशुपालनातून होते, असे प्रतिपादन गोवा राज्य संशोधन प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रो. डॉ. एम.के.जनार्थनम् यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय केपे येथील प्राणीशास्त्र विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या पशुसंवर्धन आणि शाश्वत विकास या विषयावरील तीन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्‍घाटनसमारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयदीप भट्टाचार्य, डॉ. आर.जी.कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. शाश्वत पशुपालन व्यवसायाला प्रोत्साहान देणे आणि भारताच्या पशुसंवर्धन क्षेत्रातील आव्हाने आणि त्यावरील उपाय शोधणे आणि ग्रामीण विकासाला चालना देणे हा कार्यशाळा आयोजनामागचा हेतू होता. जनार्थनम् म्हणाले की, पशुपालन हा भारतीय शेती व्यवसायातील अपयश भरून काढणारा महत्त्वाचा घटक आहे. हे पशुपालन ग्रामीण रोजगार निर्मितीत महत्त्वाचे योगदान देऊ शकते. याशिवाय या पशुपालनातून मिळणाऱ्या दूध, अंडी, मांस यातून कुपोषणासारख्या परिस्थितीवर मात करता येते.

## तज्ज्ञांनी घेतला पशुधनाशी निगडित व्यवसायांचा वेध

**बीजभाषण पशुसंवर्धन आणि शाश्वत विकास या विषयावर डॉ. आय.के. पै यांनी केले. डॉ. त्रियेश मयेकर यांनी मत्स्यपालन, डॉ.अमिया रंजन साहू यांचे डुक्करपालन, डॉ. लक्ष्मण सावंत यांचे दुग्ध व्यवसाय, डॉ. प्रशस्थ व्ही. यांचे कुक्कुटपालन तर सुप्रजित रायकर यांचे मधमाशी पालन यावर मार्गदर्शन केले.**

## पशुपालन : रोजगार, तंत्रे आणि पद्धती

**१.डॉ. मॅलोरी मारिया फेराँव यांनी पशुपालनात स्वयंरोजगाराची संधी यावर भाष्य केले. मारिया अँटोनेटा नोरोन्हा यांनी पौष्टिक पाककृतीचे स्वरूप विशद केले. डॉ. हृषिकेश पवार यांनी शाश्वत पशुपालनासाठी व्यावहारिक तंत्रे आणि मत्स्यालय टाकी तयार करण्याची पद्धत उलगडून दाखवली. २. डॉ.सुरेश कुंकळ्ळीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारोपसत्रात स्वयंरोजगाराच्या संधी आणि ग्रामीण स्थिरता वाढवण्यासाठी सरकारी योजना आणि नाविन्यपूर्ण शेती धोरणांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.**

# समाजासाठी कार्यरत असलेल्या ‘विघ्नहर्ता’च्या पदाधिकाऱ्यांचे उल्लेखनीय कार्य

**अॅड. मनोहर आडपईकर यांचे प्रतिपादन : विघ्नहर्ता महागणपती देवस्थानचा वर्धापनदिन**




आगोंद : कार्यक्रमात बोलताना अॅड. मनोहर आडपईकर. बाजूला नगराध्यक्ष सारा देसाई व इतर.

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ८ :** समाजासाठी चांगले काम केलेल्या व्यक्तींचा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करताना मला अतिशय आनंद होत असून विघ्नहर्ता महागणपती संस्थेचे पदाधिकारी गेल्या अनेक वर्षापासून समाजासाठी कार्य करत आहेत, यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत, असे उद्‍गार ओबीसी कमिशनचे चेअरमन अॅड. मनोहर आडपईकर यांनी काढले.

देवाबाग, काणकोण येथील विघ्नहर्ता महागणपती देवस्थानचा वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानी काणकोण नगराध्यक्ष सारा शंभा नाईक देसाई होत्या. तर मल्लिकार्जुन देवस्थान समितीचे माजी अध्यक्ष राजेंद्र देसाई, ज्येष्ठ नागरिक बाबुसो नाईक गावकर, नगरसेवक धीरज नाईक गावकर, देवगी पुरुष देवस्थानचे अध्यक्ष रघुवीर कोमरपंत आदी उपस्थित होते.

सारा देसाई यांनी सांगितले की, या भागातील जी विकासकामे बाकी आहेत, ती लवकरच मार्गी लावण्यात येतील. या भागाच्या विकासासाठी आपण कटिबद्ध आहे. राजेंद्र देसाई यांनी सांगितले की, संस्था चांगले काम करत असून अशा संस्थांना समाजाकडूनही आवश्यक ते सहकार्य मिळण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वांनीच या संस्थेच्या कार्यात सक्रिय पाठिंबा द्यावा.

या गुणगौरव समारंभावेळी डॉ. विठ्ठल देसाई यांच्या स्मरणार्थ निवृत्त आरोग्य कर्मचारी शरद दत्तात्रय नाईक भगत, ज्येष्ठ कलाकार कुशाली कोमरपंत, माजी नगराध्यक्ष अजय भगत, प्रशाली पी. देसाई, भजनी कलाकार रामनाथ टी. पागी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी काणकोण तालुक्यातून दहावीतून प्रथम आलेल्या अपेक्षा ग. बोळणेकर, आयुष्का कोमरपंत, ग्रीष्मा गि. भगत तर युकेमध्ये डॉक्टरेट पदवी मिळवणाऱ्या धन्वी फोंडेकर यांचा गौरव करण्यात आला. यानंतर देणगी कुपनांचा ड्रॉ काढण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईश पंढरी कोमरपंत आणि दिलीप कुशाली कोमरपंत यांनी तर उपस्थितांचे स्वागत व ओळख संस्थाध्यक्ष सोयरू कोमरपंत यांनी तर रोहन कोमरपंत यांनी आभार मानले.

**CHANGE OF NAME**

I **JASMINE PEREIRA,** resident of House No.52/4, Igrozwado, Azossim, Tiswadi, P.O.Mandur, North Goa, Goa, Pin:403104, would like to change my name from **JASMINA GONSALVES** to **JASMINE PEREIRA** hereafter in all my dealings and documents I will be known by my new name as **JASMINE PEREIRA.**

**CHANGE IN NAME**

I, **Satich Calidas Chodancar** Resident of H NO B52 NR VITHOBA TEMPLE BETIM REIS MAGOS BARDEZ NORTH GOA, 403114, Goa, INDIA, hereby change my name from **Satish Kalidas Chodankar** to **Satich Calidas Chodancar.** Hereafter in all my dealings and documents, my name will be known by **Satich Calidas Chodancar.**

**SUMMONS FOR TRIAL AND DISPOSAL OF CASE UNDER SECTION 83 OF THE GCS ACT READ WITH ORDER 5 RULE 20 (1) OF CIVIL PROCEDURE CODE BEFORE THE NOMINEE OF THE REGISTRAR OF CO-OPERATIVE SOCIETIES, GOA. BEFORE**
**Adv. Sagar. R. Parab, Office No.65, 2nd Floor, Commerce Centre, Tisk, Ponda-Goa.**
**Case No. VPK/RO/ABN/3/2024**

VPK Urban Co-op. Credit Society Ltd., Shop No. A-SH-11 to 14, "Aqua Marina", Grande Vanelim, Colva, Salcete- Goa. ... Disputant

V/s

Mr. Daniel Rochaand others ... Opponents

**NOTICE**

To,
2. Mr. Valeriano J. F. Fernandes, R/o. H. No.631/2, Grande Pulwaddo, Benaulim, Salcete - Goa.
3. Mr. Ravi Jaywant Harijan, R/o. H. No.32, Pedda, Margao, Salcete - Goa.

Whereas, above named disputant has raised a dispute against you before this Court Claiming recovery of money along with interest therein and cost of the proceedings.

And whereas summons issued to you at your last known address have not been served.

Whereas disputant has prayed for substitute service by way of publication in the local newspaper and this court is satisfied that this is a fit case for ordering such service.

Now, therefore, this notice is hereby given to you to appear before this court on 05/03/2025 at 4.30 P.M. either in person or by a pleader duly instructed to answer all material questions relating to the dispute along with written submissions if any.,

Take notice that in default of your appearance on the day and time stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 25th day of January, 2025.

Sd/- **(Adv. Sagar R. Parab)**
Nominee of the Registrar of Co-operative Societies, Goa.
SEAL

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the Public in general that my client Mr. Devappa Bassappa Telagi, R/o. H no 20/1, Near Gurudwara, Mangor Hill, Vasco da Gama, Goa has purchased ALL THAT PLOT No.29 admeasuring an area of 306:00 square meters part of the property known as "GALLE GRANDE" or "VADACHY GALLE" situated at Chicolna Village, Taluka and Sub Registration of Mormugao, District of South Goa surveyed under survey No.1, Sub Division No.1 , Situated at Chicolna Village, within the Village Panchayat of Chicolna, Mormugao Taluka, South District of Goa, State of Goa from MRS. BERNARDETTE SILVEIRA and her husband Mr. Mario Zeferino Fernandes through their Attorney Mrs. Enny Mary Fernandes..

It is hereby informed to the general Public that the original Deed of Sale dated 28-05-2010, registered before the Sub-Registrar of Mormugao under Registration no.1010 at pages 77 to 89, Book No. I, Volume no. 1112, date 31-05-2010 is lost and not traceable and accordingly Bernardette Silveira have lodged a Missing Complaint before the Vasco Police Station on 25-01-2023 and Vasco Police Station have issued Missing /Lost Article Certificate vide letter dated 25-01-2023.

That any person/Bank/Financial Institutions are hereby requested to lodge any Objection if any with Original documents **within 7 days** of the publication or else Mr. Devappa Bassappa Telagi will be free to mortgaged the same with Canara Bank, Vasco da Gama, Goa branch or any other nationalized Banks.

Date: 08-02-2025

Sd/-
**Adv Rajkumar N. Naik.**
**Advocate and Notary**
Shop no. 54, Second Floor, Apna Bazar Bldg, Vasco da Gama, Goa.
Mb. 9423819813

Sandeep Ads

**CHANGE IN NAME**

I **KAREN MILDRED FERNANDES De SOUZA**, r/o H.no. 1281, Khursa Waddo, Carona, North Goa, 403523 Goa. like to change my name from **KAREN MILDRED De SOUZA** to **KAREN MILDRED FERNANDES De SOUZA.** Hereafter in all my dealings and documents I will be known by the name **KAREN MILDRED FERNANDES De SOUZA.**

**IN THE COURT OF THE MAMLATDAR OF BARDEZ TALUKA AT MAPUSA - GOA**
**Case No.: MAM/MND/PUR/ 2/ 2010**

1. Shri.Pandharinath Redkar, r/o H.No.14 (3), old (79/1) Vancio Eaddo, Guirim Bardez-Goa . ....Applicant

V/S

1. Miss Telma Gonsalves, r/o Kumbya waddo, Guirim 2. Shanta Dabholkar (Since deceased through her LRs ) a. Chandrakant Shiva Dabholkar b. Parshuram B.Dabholkar Both r/o Guirim Bardez-Goa ... ...Opponents

To, The Opponents.

**PUBLICATION NOTICE**

WHEREAS this office has received Memorandum from Dy. Collector as SDO-II Mapusa alongwith Mundkar Appeal Order dated 7/11/2023 stating that appeal application dated 31/01/2020 is hereby allowed and the Mamlatdar of Bardez to give fresh hearing alongwith appellant to make amendment of the description in Mundkar Purchase case.

And Whereas the applicant by application dated 21/1/2025 informed that the notices issued returned unserved with the postal remark "Addresses out of station" and that the applicant is not aware of any other addresses of the said opponents and it is therefore prayed for substitute service to the said opponent and the, heirs by way of publication in daily newspaper.

And Whereas this Court is satisfied that this is a fit case for ordering such service.

Now therefore, notice is hereby given to you under Order V of Rule 20(1)A of the C.P.C. 1908 to appear before this Court either in person or by duly authorization on **20/02/2025, 10.30** to answer the claim.

Take notice that in default of your appearance as aforesaid on the date and time mentioned above, the application will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 5th day of February, 2025.

**SD/- (Anant Rajaram Malik)**
**Mamlatdar of Bardez Taluka, Mapusa Goa.**
SEAL

**IN THE COURT OF JOINT MAMLATDAR VI OF BARDEZ TALUKA AT MAPUSA, GOA**
**Mutation Case No: 98664, 98665, 98666 Village: Colvale**

Prakash Ramkrishna Parsekar alias Prakash Ramakrishna Parsekar, R/o Colvale, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Bhagwan Ramkrishna Parshekar 2. Bholanath Ramkrishna Parshekar 3. Devendra Ramkrishna Parshekar 4. Digamber Hadfadkar 5. Hari Divkar 6. Kusum Hari Divkar 7. Pratap Ramkrishna Parshekar 8. Premavati Parsekar 9. Rama Krishna Manguesh Parsekar 10. Shashikant D. Parshekar 11. Shrikant B. Parshekar 12. Shrimati Parshekar 13. Sudin Ramkrishna Parshekar 14. Sunita G. Hadfadkar 15. Suresh Ramkrishna Parshekar 16. Susmita D. Hadfadkar ....Opponents

**PUBLIC NOTICE**

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicant Prakash Ramkrishna Parsekar alias Prakash Ramakrishna Parsekar, R/o Colvale, Bardez, Goa has applied for mutation under section 96 of L.R.C. 1968 to include his name after deleting the name of Rama Krishna Manguesh Parsekar in occupant column of Sy. No. 273/7, 360/6 and 356/4 of Village Colvale as Co-occupant as per Order dated 27.07.2011 passed in Inventory Proceeding No. 45/93 in the Court of the Civil Judge Senior Division at Mapusa Goa and Agreement for Partition dated 10.11,2010.

Whereas, the notices in Form no. X were sent to all the interested parties by registered Ad. However some notices could not be served and returned unserved with postal remark expired, incomplete address, house locked, not known, insufficient address and party out of station etc.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 03/02/2025

Sd/- **Saiesh S. Naik**
Joint Mamlatdar VI of Bardez Taluka, Mapusa
Seal

**SUMMONS FOR TRIAL AND DISPOSAL OF CASE UNDER SECTION 83 OF THE GCS ACT READ WITH ORDER 5 RULE 20 (1) OF CIVIL PROCEDURE CODE BEFORE THE NOMINEE OF THE REGISTRAR OF CO-OPERATIVE SOCIETIES, GOA.**
**BEFORE Adv. Sagar. R. Parab, Office No.65, 2nd Floor, Commerce Centre, Tisk, Ponda-Goa.**
**Case No. VPK/RO/ABN/4/2024**

VPK Urban Co-op. Credit Society Ltd., Shop No. A-SH-11 to 14, "Aqua Marina", Grande Vanelim, Colva, Salcete - Goa. ... Disputant

V/s

Mr. Akbarali Abdulgafarsab Bepari, and others. ... Opponents

**NOTICE**

To,
1. Mr. Akbarali Abdulgafarsab Bepari, R/o. Flat No.G 1/2, Kurtarkar Glory, Pedda, Benaulim, Salcete - Goa.
2. Mr. Ravi Jaiwant Harijan, R/o. H. No.11/E, Sirvodem, Navelim, Salcete - Goa.
3. Mr. Riyaz Ahmed Bepari, R/o. H.No.182/D, Tolleband, Davorlim, Salcete - Goa.

Whereas, above named disputant has raised a dispute against you before this Court Claiming recovery of money along with interest therein and cost of the proceedings.

And whereas summons issued to you at your last known address have not been served.

Whereas disputant has prayed for substitute service by way of publication in the local newspaper and this court is satisfied that this is a fit case for ordering such service.

Now, therefore, this notice is hereby given to you to appear before this court on 05/03/2025 at 4.30 P.M. either in person or by a pleader duly instructed to answer all material questions relating to the dispute along with written submissions if any.

Take notice that in default of your appearance on the day and time stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 25th day of January, 2025.

Sd/- **(Adv. Sagar R. Parab)**
Nominee of the Registrar of Co-operative Societies, Goa.
SEAL

## पान १ वरून

**दिल्लीत ‘कमळ’, आपचे पानीपत**

टाकले. यंदा दिल्लीत भाजप आणि आपमध्ये थेट निवडणूक झाली. पण या सगळ्यात खरा गेम काँग्रेसने केला. २०१५, २०२० आणि आता २०२५, अशा सलग तीन निवडणुकांमध्ये काँग्रेसला दिल्लीत भोपळाही फोडता आलेला नाही. पण या निवडणुकीत त्यांनी अरविंद केजरीवालांच्या आपचे मोठे नुकसान केले. दरम्यान, २०२० मध्ये झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आपला ५३ टक्क्यांहून अधिक मतदान झाले होते. तर भाजपला ३८.५१ टक्के मतं मिळाली होती. मात्र, यंदा आप’ला ४३.६१ टक्के मते पडली आहेत. तर भाजपला ४५.८८ टक्के मते मिळाली आहेत. दोन्ही पक्षांना मिळालेल्या मतांमध्ये केवळ २.२७ टक्क्यांचे अंतर आहे. पण त्यामुळे जागांमध्ये पडलेला फरक तब्बल २६ चा आहे. तसेच यंदाही काँग्रेसला १० टक्क्यांहून कमी मते पडली आहेत.

### मोदी साहेब! जरा केबल कटिंग मोहीम थांबवा...

राहणार नाही, ज्यामुळे राज्याचे शैक्षणिक मानक खराब होऊ शकतात. दरम्यान, वीज विभागाने एक सार्वजनिक सूचना जारी केली आहे ज्यामध्ये केबल ऑपरेटर्सना दहा दिवसांच्या आत वीज खांबांवरील त्यांचे पायाभूत सुविधा काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. विभागाने असा इशारा दिला आहे की जर त्यांनी हे पालन केले नाही तर अधिकाऱ्यांकडून केबल्स काढून टाकल्या जातील.

### मडगावच्या पदपथांवर अतिक्रमणे सुरूच

अधिकाऱ्यांनी या समस्येचे निराकरण करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. आम्ही नियमितपणे अतिक्रमणांविरुद्ध मोहिमा राबवतो, असे एका महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याने सांगितले. तथापि, रहिवाशांचा असा युक्तिवाद आहे की ही समस्या विशेषतः आठवड्याच्या शेवटी, विशेषतः जुना स्टेशन रोड आणि महानगरपालिका इमारतीजवळ, जिथे शनिवार आणि रविवारी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे दिसून येतात, तेथे मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. दुकान मालकांसह नागरिकांनी एमएमसीला आठवड्याच्या शेवटी या उपक्रमांवर कडक नजर ठेवण्यासाठी आणि फूटपाथ जनतेसाठी सुलभ राहतील याची खात्री करण्यासाठी एक देखरेख पथक तैनात करण्याची विनंती केली आहे.

### तंत्रज्ञान विकासात चीन – अमेरिकेत काटे की टक्कर सुरू!

चॅटबॉट डीपसीकच्या यशाबाबत अनेक विश्लेषकांचे असे म्हणणे आहे की, निर्यातीवर अमेरिकेच्या नियंत्रणामुळे, कंपनीला मॉडेल्सचे प्रशिक्षण देण्यासाठी शक्तिशाली चिप्स मिळाल्या नाहीत.या कारणास्तव, कंपनीने कमी शक्तिशाली चिप वापरली आणि नवीन तंत्रज्ञानाद्वारे कमी खर्चात चॅटबॉट तयार केला.मात्र, विरोधक या दाव्यांना आव्हान देत आहेत. पण डीपसीकने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनाही आश्चर्यचकित केले आहे आणि त्यांनी याला देशातील मोठ्या एआय कंपन्यांसाठी वेकअप कॉल म्हटले आहे.

चीनच्या ’ एआय ’ कंपन्यांकडे इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त पेटंट आहेत. अलीबाबा आणि बाइटडान्स सारख्या चिनी कंपन्या त्यांच्या उत्पादनांद्वारे जितके पैसे कमवत आहेत तितकेच पैसे गुगल आणि ओपन एआय त्यांच्या उत्पादनांमधून कमावतात.तथापि, ’मेड इन चायना २०२५ ’ असूनही, अमेरिका ’ एआय ’ मध्ये जागतिक आघाडीवर आहे.चिनी शास्त्रज्ञ क्वांटम कंप्युटिंगमध्ये अधिक शोधनिबंध प्रकाशित करत आहेत, परंतु असे असूनही अमेरिका अनेक बाबतीत क्वांटम संगणनामध्ये खूप पुढे आहे.चीनच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी अमेरिका मायक्रोचिप उत्पादनात शेकडो अब्ज डॉलर्स उभे करण्याचा प्रयत्न करत आहे.राष्ट्रीय सुरक्षेची चिंता हे चीनच्या मार्गातील आव्हान आहे. टिकटॉक ला अमेरिकेत खूप यश मिळाले, पण आता त्यावर बंदी येण्याचा धोका आहे कारण तो राष्ट्रीय सुरक्षेला धोका आहे.डीपसीकसोबतच चिनी ई–कॉमर्स कंपनी टेमू आणि शीनची प्रगतीही चर्चेत आहे.

# ‘राज्य दिव्यांगजन’तर्फे सलिल यांना निओ मोशन मोटाराइज्ड व्हीलचेअर

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ८ : दिव्यांग व्यक्तींना स्वतःहून प्रवास करता यावा आणि त्यांना स्वतंत्रपणे स्वतःची कामे करणे शक्य व्हावे या उद्देशाने राज्य दिव्यांगजन आयुक्त कार्यालयाच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा एक भाग म्हणून सलिल महाले यांना निओ मोशन मोटाराइज्ड व्हीलचेअर प्रदान करण्यात आली. राज्याचे दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाचे मंत्री सुभाष फळदेसाई, राज्य दिव्यांगजन आयुक्त गुरुप्रसाद पावसकर, राज्य दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाच्या संचालिका वर्षा नाईक आणि राज्य दिव्यांगजन आयुक्त कार्यालयाचे सचिव ताहा हाझिक यांच्या उपस्थितीत ही व्हीलचेअर वितरित करण्यात आली. याप्रसंगी आयुक्त पावसकर म्हणाले, दिव्यांग व्यक्तींना गतिशीलता आणि प्रवेश सुलभतेद्वारे सक्षम करणे या बाबींना आमच्या कार्यालयाने प्राधान्य दिले आहे. सलिल महाले यांना ही मोटाराइज्ड व्हीलचेअर वितरणाद्वारे दिव्यांग व्यक्तींची आत्मनिर्भरता वाढवणे आणि त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या एक पाऊल आम्ही उचचले आहे. सर्वसमावेशकता वाढवणे आणि जीवनाच्या विविध क्षेत्रात कार्यरत राहण्यासाठी दिव्यांगजनांना सक्षम करणे या कामी होणाऱ्या प्रयत्नांना, उपाययोजनांना आवश्यक पाठबळ, प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

सलिल महाले म्हणाले की, या पाठबळ–प्रोत्साहनासाठी मी राज्य दिवयांगजन आयुक्त कार्यालयाचे, विशेषतः श्री. गुरुप्रसाद पावसकर यांचे मनापासून आभार मानतो. या मोटाराइज्ड व्हीलचेअरने माझी गतिशीलता आणि स्वातंत्र्य मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. यामुळे मी माझी दैनंदिन कामे आत्मविश्वासाने व अधिक स्वतंत्रपणे करू शकणार आहे. दिव्यांगन व्यक्तींना सक्षम करण्यासाठी त्यांनी दिलेले पाठबळ आणि त्यांचा निर्धार यासाठी मी आयुक्त कार्यालयातील संपूर्ण टीमचे मनापासून आभार मानतो. दिव्यांग व्यक्तींना स्वतंत्रपणे हालचाल व प्रवास सुलभपणे करता यावा यासाठी राज्य दिव्यांगजन आयुक्त कार्यालयाने सातत्याने व्यापक प्रयत्न राबवले आहेत. सर्वसमावेशकता आणि व्यक्तिस्वातंत्र्य उपलब्ध करण्याच्या उद्देशाने कार्यालयाद्वारे यापूर्वीही दिव्यांग व्यक्तींना मोटराइज्ड ई–बाईकचे वितरण केले असून, या साधनांमुळे या दिव्यांग व्यक्तींना दैनंदिन कामे अधिक सहज, सुलभ व आत्मविश्वासाने करता येत आहेत.




# क्षयरोगाविरुद्धची लढाई जिंकता येते..!

टीम दैनिक हेराल्ड

**डॉ. अतुल पै बीर : साखळी सरकारी महाविद्यालयात विशेष व्याख्यान**

साखळी, दि. ६: क्षयरोगाचे लवकर निदान होणे गरजेचे असते. याशिवाय क्षयरोगींसाठी पुरेशी आधारभूत व्यवस्था आणि प्रतिबंधात्मक उपचार केल्यास क्षयरोगाविरुद्धची लढाई सहज जिंकता येते, असे प्रतिपादन सीएचसी साखळी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अतुल पै बीर यांनी केले. साखळी सरकारी महाविद्यालयातील एन.एस.एस.विभाग आणि वैद्यकीय सेवा आणि प्रथमोपचार कक्षाच्या संयुक्त विद्यमाने क्षयरोग जागृतीविषयी आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ. अतुल पै.बीर यांचे स्वागत रोपट्याची कुंडी देऊन करण्यात आले. प्रा. अल्फियस फर्नांडिस यांनी त्यांची ओळख करून दिली. अंकिता वेरेकर यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांना क्षयरोगाचा प्रसार, प्रतिबंध आणि उपचार याबद्दल शिक्षित करणे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या क्षयमुक्त भारत या संकल्पनेच्या पूर्तीसाठी प्रयत्न करणे हा या व्याख्यानामागील आयोजनाचा हेतू होता.